महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

**सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/१९९००** **दिनांक :२० जून २०१४**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २२३

**विषय :- कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "कृषी संजीवनी योजना-२०१४"**

**संदर्भ :- शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.१९.६.२०१४.**

कृषी ग्राहकांवरील वीज बिलाच्या थकीत रक्कमेचा बोजा कमी करण्याकरीता शासनाने संदर्भातील शासन निर्णयानुसार "कृषी संजीवनी योजना-२०१४" राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सदर कृषी संजीवनी योजना -२०१४ ची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) हया योजनेसाठी चालू (Live) कृषी ग्राहकांना त्यांच्या दि.३१.३.२०१४ पर्यतची मुळ रक्कमेची ५०% रक्कम एकरकमी किंवा तीन मासिक हप्त्यामध्ये भरली तर उरलेली ५०% मुळ थकीत रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे महावितरणला विद्युत कायदा-२००३, कलम-६५ प्रमाणे रोखीने व समप्रमाणात अनुदान स्वरुपात अदा करण्यात येईल. तसेच या योजनेमध्ये भाग घेणा-या कृषी ग्राहकांचे ३१.३.२०१४ रोजी थकीत असलेले पुर्ण व्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येईल.

२) कृषी ग्राहकांना ५०% मुळ थकबाकीची रक्कम खालीलप्रमाणे हप्त्यामध्ये भरावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत | - | कमीत कमी २०% |
| ब) ३० सप्टेंबर २०१४ पर्यंत | - | कमीत कमी २०% |
| क) ३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत | - | कमीत कमी १०% किंवा उरलेली रक्कम |

**किंवा**

२.१) ५० % मुळ थकबाकी एकरकमी ३१ ऑगस्ट २०१४ पुर्वी भरता येऊ शकते.

३) योजनेत सहभागी झालेल्या कृषी ग्राहकांना १ एप्रिल २०१४ नंतरची सर्व चालू वीज बिले पुर्णपणे व नियमितपणे भरणा करणे आवश्यक आहे.

४) दिनांक ३१.३.२०१४ रोजी जे ग्राहक थकबाकीदार नाहीत, अशा ग्राहकांची पुढील दोन त्रैमासिक बिले ५०% माफ करण्यात येतील व माफ केलेली रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे महावितरणला रोखीने व समप्रमाणात विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम-६५ नुसार अनुदान स्वरुपात अदा करण्यात येईल.

५) ज्या कृषी ग्राहकाने योजनेत सहभाग घेतला नाही अथवा योजनेअंतर्गत ठरविण्यात आलेल्या रकमेचा भरणा केला नाही अशा कृषी ग्राहकांना योजनेकरीता अपात्र ठरविण्यात येईल व नियमाप्रमाणे व्याज व दंडासहीत पुर्ण रक्कम पुनःश्च ग्राहकाच्या खात्यात दर्शविली जाईल व विद्युत कायदा-२००३ नुसार थकबाकी वसुली करीता नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी प्रसिध्दी माध्यमाद्वारे "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला व्यापक प्रसिध्दी दयावी. तसेच ग्रामसभा, ग्रामपंचायतीचे सदस्य, पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे सभासद व स्थानिक लोकप्रतिनिधीना सदर योजना अवगत करुन देण्यात यावी.

सदर योजना प्रयत्नपुर्वक राबविल्यास शेतक-यांवरील थकबाकीचा बोजा कमी होईल व थकबाकीची वसुली सुध्दा होईल. वरील मार्गदर्शकतत्वांच्या आधारे "कृषी संजीवनी योजना-२०१४" ची परिणामकारक अंमलबजावणी होईल याबाबत सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.